RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार – ब

वर्ष ४, अंक ४५(२)] बुधवार, जुलै ४, २०१२/आषाढ १३, शके १९३४ [पृष्ठे ६

किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ९७

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

वित्त विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जुलै २०१२.

## अधिसूचना

**महाराष्ट्र ऊस खरेदीकर अधिनियम, १९६२.**

क्रमांक ऊखक. १०११/ प्र.क्र.२०७/ कराधान-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम १९६२ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झालेली आहे, आणि त्यामुळे महाराष्ट्र ऊस खरेदीकर अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा. ९) च्या कलम १८ च्या उप-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही.

म्हणून, आता, उक्त अधिनियमांच्या कलम १८ च्या उप-कलम (४) च्या परंतुकासह, उप-कलम (१) आणि (२) मधील शक्तींचा वापर करून तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा

वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम, १९६२ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र ऊस खरेदीकर (सुधारणा) नियम, २०१२ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम, १९६२ (यापुढे मुख्य नियम असे संबोधण्यात येईल), च्या नियम २ च्या खंड (क-अ) ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"(क-अ) निर्धारणा प्राधिकारी म्हणजे ज्येष्ठ खरेदीकर उप-आयुक्त (ऊस), खरेदीकर उप-आयुक्त (ऊस), सहाय्यक खरेदीकर आयुक्त (ऊस) किंवा यथास्थिती, खरेदीकर अधिकारी (ऊस) ज्याला आयुक्तांनी निर्धारणेचे अधिकार प्रदान केलेले आहेत आणि ज्याच्या कार्यक्षेत्रात व्यापा-याच्या धंद्याचे ठिकाण किंवा, यथास्थिती, व्यापा-याच्या धंद्याचे मुख्य ठिकाण आहे."

३. मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये, "खरेदीकर अधिकारी (ऊस)" हे शब्द ज्या दोन्ही ठिकाणी आहेत तेथे "निर्धारणा प्राधिकारी" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

४. मुख्य नियमांच्या नियम १० मध्ये, उप-नियम (१) नंतर खालील उप-नियम दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"(२) कायद्याखालील प्रत्येक कर, व्याज, दंड यांचा भरणा किंवा, यथास्थिती विवरणासोबत करावयाच्या भरण्याव्यतिरिक्त कायद्यान्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेचा भरणा शासकीय कोषागारात नमुना एमटीआर-६ या चलनामध्ये करावा."

५. मुख्य नियमाच्या नियम ११ मध्ये उप-नियम (१) मध्ये, "खरेदीकर अधिकारी (ऊस)" हे शब्द ज्या दोन्ही ठिकाणी आहेत येथे "निर्धारणा प्राधिकारी" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

६. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये,—

(१) उप-नियम (२) मध्ये, "धनादेशांद्वारे नियम १०" या शब्दांनी सुरू होणा-या आणि "याजकडे सादर करील" या शब्दांनी संपणा-या भागाऐवजी खालील दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"त्या नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेचा भरणा शासकीय कोषागारात नमुना एमटीआर-६ या चलनामध्ये करील."

(२) उप-नियम (३) मध्ये, "किंवा कलम ९ अन्वये कोणतेही पुनरीक्षण" या शब्द आणि अंकानंतर "किंवा कलम ७ ई अन्वये कोणताही कराचा परतावा" हे शब्द आणि अंक दाखल करण्यात येत आहेत.

७. मुख्य नियमांच्या नियम १६ ऐवजी खालील नियम दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

“(१६)(१) कायद्याच्या कलम ७ अन्वये निर्धारणेच्या किंवा कलम ७अ अन्वये लादलेल्या शास्तीच्या किंवा कलम ७ब अन्वये लावलेल्या कोणत्याही व्याजाच्या आदेशाविरुध्द कलम ८ अन्वये करावयाचे अपील ”,—

(क) जर आदेश, सहाय्यक खरेदीकर आयुक्त (ऊस) किंवा खरेदीकर अधिकारी (ऊस) यांनी पारीत केलेले असतील तर ते खरेदीकर उप आयुक्त (ऊस) यांचेकडे राहील.

(ख) जर आदेश, ज्येष्ठ खरेदीकर उप आयुक्त (ऊस) किंवा खरेदीकर उप आयुक्त (ऊस) यांनी पारीत केलेले असतील तर ते खरेदीकर सह आयुक्त (ऊस) यांचेकडे राहील.

(२) अपिलात दिलेल्या आदेशाविरुद्ध कलम ९ अन्वये करावयाच्या पुनरिक्षणाचा अर्ज,—

(क) जर अपील आदेश हा खरेदीकर उपआयुक्त (ऊस) यांनी पारीत केलेला असेल तर खरेदीकर सह आयुक्त (ऊस) यांच्याकडे राहील.

(ख) जर अपील आदेश हा खरेदीकर सह आयुक्त (ऊस) यांनी पारीत केलेला असेल तर अपर खरेदीकर आयुक्त (ऊस) यांच्याकडे राहील. ”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. चै. भांगडीया,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 4th July 2012

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PURCHASE TAX ON SUGARCANE ACT, 1962.

No. SCPT-1011/CR-207/Taxation-3.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Purchase Tax on Sugarcane Rules, 1962 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section (*4*) of section 18 of the Maharashtra Purchase Tax on Sugarcane Act, 1962 (Mah. IX of 1962) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*4*) of section 18 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Purchase Tax on Sugarcane Rules, 1962, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Purchase Tax on Sugarcane (Amendment) Rules, 2012.

2. In rule 2 of the Maharashtra Purchase Tax on Sugarcane Rules, 1962, [hereinafter referred to as " the principal Rules "], for clause (c-a), the following clause shall be substituted, namely :—

" (*c-a*) " Assessing Authority " means the Senior Deputy Commissioner of Purchase Tax (Sugarcane), Deputy Commissioner of Purchase Tax (Sugarcane), Assistant Commissioner of Purchase Tax (Sugarcane) or as the case may be, the Purchase Tax Officer (Sugarcane), to whom the power to assess a dealer has been delegated by the Commissioner and within whose jurisdiction the place of business of the dealer or, as the case may be, the chief place of business of the dealer, is situated.".

3. In rule 8 of the principal Rules, for the words and brackets " Purchase Tax Officer (Sugarcane) ", at both the places where they occur, the words " Assessing Authority " shall be substituted.

4. In rule 10 of the principal Rules, after sub-rule (*1*), the following sub-rule shall be inserted, namely :—

" (*2*) Every payment of tax, interest, penalty under the Act or as the case may be, any amount payable under the Act other than the payment to be made along with the return shall be paid into the Government Treasury by chalan in Form MTR-6.".

5. In rule 11 of the principal Rules, in sub-rule (*1*), for the words and brackets " Purchase Tax Officer (Sugarcane) ", at both the places where they occur, the words " Assessing Authority " shall be substituted.

6. In rule 12 of the principal Rules,—

(1) in sub-rule (*2*), for the portion beginning with the words " by cheque to the Commissioner " and ending with the words " receipted Treasury chalan showing such payment.", the following shall be substituted, namely :—

" into the Government Treasury in the chalan Form MTR-6 " ;

(2) in sub-rule (*3*), after the words and figures " under section 9," the words, figure and letter " or any tax refundable under section 7E," shall be inserted.

7. For rule 16 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

" 16. (*1*) An appeal under section 8 of the Act against an order of assessment under section 7 or penalty imposed under section 7A or any interest charged under section 7B,—

(*a*) passed by Purchase Tax Officer (Sugarcane) or an Assistant Commissioner of Purchase Tax (Sugarcane) shall lie to the Deputy Commissioner of Purchase Tax (Sugarcane),

(*b*) passed by a Senior Deputy Commissioner of Purchase Tax (Sugarcane) or Deputy Commissioner of Purchase Tax (Sugarcane) shall lie to the Joint Commissioner of Purchase Tax (Sugarcane).

(2) An application for revision under section 9 of the Act, against an order passed in appeal,—

(*a*) by the Deputy Commissioner of Purchase Tax (Sugarcane) shall lie to the Joint Commissioner of Purchase Tax (Sugarcane) ;

(*b*) by the Joint Commissioner of Purchase tax (Sugarcane) shall lie to the Additional Commissioner of Purchase Tax (Sugarcane).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

O. C. BHANGDIYA,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.